# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 05/04/2023 (बुधवार) दुपार

---

### दुखापत

**पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत ०१ कि मी अंतरावरील मौजा इंदिरा नगर वार्ड क्र १ कांद्री कन्हान येथे दिनांक ०२/०४/२०२३ चे २१/०० वा. ते दिनांक ०३/०४/२०२३ चे ०६/०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ सुनिता विष्णुजी मेश्राम वय ४५ वर्ष रा. इंदिरा नगर वार्ड क्र १ कांद्री कन्हान व आरोपी नामे– मनश्री अरबट रा. इंदिरा नगर वार्ड क्र १ कांद्री कन्हान हे एकमेंकाचे घरा शेजारी राहत असून यातील आरोपी ने गल्लीत ठेवलेल्या सिमेंट च्या शिटा ठेवण्याच्या कारणावरून फिर्यादीस अश्लिील शिवीगाळ केली फिर्यादीचा मुलगा ठेवलेल्या शिटा काढत असता बासाच्या दांडयाने फिर्यादीचे मुलाचे उजव्या हातावर मारून जखमी केले व पाहुन घेण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, २९४, ५०६, भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा खुशाल रामटेके ब नं २९८ मो. क्र ८४८५८६१४४२ हे करीत आहे.

### जबर दुखापत

**पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत १० कि मी अंतरावरील वडोदा ता. कामठी येथे दिनांक ०३/०४/२०२३ चे २१.३० वा दरम्यान फिर्यादी नामे– सौ शारदा जिवन चौधरी, वय ३६ वर्षे रा. वडोदा ता. कामठी ही माहेरी गेली असता तिच्या सासरी वडोदा येथील घरी फिर्यादी हीचे पती **आरोपी नामे– १) जिवन चौधरी, रा. वडोदा ता कामठी २) शितल पानबुडे रा. वडोदा ता कामठी** हे दोघेही सोबत स्लॅपवर झोपलेले फिर्यादीला दिसले तेव्हा फिर्यादीने त्यांना हटकले असता आरोपी क्र. १ व २ यांनी तिला ढकल ढुकल करून हातबुक्क्याने मारपिट केली त्यामुळे तिच्या डाव्या हाताचा अंगठा फॅक्चर झाला आहे व त्यावेळी फिर्यादीचे भाऊ अमोल वैरागडे व जावई पिन्टु बान्ते हे तिथे हजर असता त्यांनी मध्ये जावुन भांडण सोडविले असता आरोपी क्र. ३) नामे– जितु चौधरी रा. वडोदा ता. कामठी यांचे सह तिन्ही आरोपीतांनी त्यांना सुदधा मारहाण केली व जावई यांच्या मानेवर मारहान करून गळा दाबण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३२५, ३२३, ५०४, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा भगवान चांदेवार बनं ४४२ मो क्र ९७६५२२१११६ हे करीत आहे.

## विनयभंग

**पो.स्टे. केळवद :–** दिनांक ०४/०४/२०२३ चे १५/०० वा. दरम्यान फिर्यादी/पीडिता वय १२ वर्ष ०८ महिने ही आपल्या आईवडील व लहान भाऊ वय ०९ वर्ष यांच्यासह राहते माहे सप्टेंबर २०२२ ला फिर्यादीने आपल्या आईच्या रेडमी ७ प्रो या मोबाईलवर इंस्टाग्राम आयडी तयार केली. माहे आक्टोबर २०२२ मध्ये यातील **आरोपी नामे– अनील करमाड, रा. अहमदनगर** यांची एके अनिल करमड ही इंस्टाग्राम आयडी वापरणाऱ्या आरोपीने राहुरी ऑफिशियल नावाची खोटी इंस्टाग्राम आयडी तयार करुन फिर्यादीशी इंस्टाग्राम आय.डी वर तिची मावस बहिण म्हणून बोलला व फिर्यादीची मावस बहिण समजून इंस्टाग्राम आयडी वर फिर्यादीचा ब्रेस्ट वरील फोटो तिच्या इंस्टाग्राम वर पाठवून तो फिर्यादीला त्याच्याशी इंस्टाग्राम वर बोलल्या पाहीजे नाहीतर तो ती फोटो फेसबुक वर टाकुन फिर्यादीची बदनामी करील अशी धमकी दिली. तसेच त्याने फिर्यादीचा फोटो तिच्या मैत्रिणीला पाठवून तिला फिर्यादीशी बोलण्याकरीता सांगितले. फिर्यादी त्याच्याशी बोलली नाही म्हणून त्याने दि. ०४ /०४/२०२३ रोजी अखिल काळे या इंस्टाग्राम आयडी वरून फिर्यादीच्या आत्याची जाऊ यांची इंस्टाग्राम आयडी वर फिर्यादीचे ब्रेस्ट वरील फोटो पाठवून तिची बदमानी केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. केळवद येथे आरोपीविरुध्द कलम ३५४ (३) भादवी सहकलम ६७, ६७ (बी) आयटी ॲक्ट सहकलम १२ पोक्सो ॲक्ट कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि कामठे मो. नं. ९९२३२१०३४४ करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर